वाचलेः- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त,सो.यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/१५, दि.२०/१०/२०१५.
३) मुख्याध्यापक,माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव यांचे दि.०३/०४/२०१९ रोजीचे शिफारस पत्र.
४) मा.लेखाधिकारी यांचेकडील पत्र क्र.९७७/२०१६ दि.१३/०३/२०१९
५) दि.०६/०५/२०१९ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/२२३/१९
दि.०६/०५/२०१९

विषय – नियत वयोमानानूसार सेवानिवृतीबाबत.
श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"
संगणक क्र.५७४६

आदेश,

श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि.१०/०७/१९८७ रोजी रूजू झालेले आहेत.श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) यांची जन्म दिनांक २५/०५/१९६१ अशी असून त्यांच्या वयास दिनांक २४/०५/२०१९ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) यांना ३१/०५/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल, तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत होईल,अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) हे दिनांक ३१/०५/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत होतील.

श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६) यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही, व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत.तसेच इतर काही लेखा परीक्षणाची वसुली निघाल्यास त्याची संपूर्ण रक्कम श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक" (सं.क्र.५७४६) यांना सदर रक्कम रोख स्वरूपात मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक" (सं.क्र.५७४६) यांना सेवासातत्य दि.१०/०६/१९८५ पासुन देणेत आलेले आहे.परंतु श्री.उपासणी यांनी सदर कालावधीचे अंशराशीकरण (ग्रॅच्युईटी) जमा करणेत आलेली नाही. त्यामुळे

Scanned by CamScanner

श्री.उपासणी यांना त्याचा लाभ देता येत नाही. त्यांना सेवाउपदान व निवृत्तीवेतनासाठी मनपा माध्यमिक विभागाची रूजु तारीख दि.१०/०७/१९८७ धरणेत यावी.

सबब,मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११ ०१८, उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६)यांना दिनांक ३१/०५/२०१९ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक" (सं.क्र.५७४६) यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्रीम.श्री.विनय माधव उपासणी "मुख्याध्यापक"(सं.क्र.५७४६)
माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष, (प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव

२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned by CamScanner